**Government Polytechnic, Aurangabad.**
(An Autonomous Institute of Govt. of Maharashtra)
Osmanpura, Aurangabad - 431005
Phone: (Office) (0240) 2334724, (P) 2353644
website: www.gpabad.ac.in
E-mail: : principal.gpaurangabad@dtemaharashtra.gov.in

PURSUIT FOR EXCELLENCE

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र./शातंनिऔ/EC/2022/ 298 दिनांक – 26/08/2022

**महत्वाचे परिपत्रक :**

**विषय : उन्हाळी परीक्षा 2022 (212) मध्ये अंतिम सत्र / वर्षातील अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या अनुत्तीर्ण विषयांच्या फेरपरीक्षेबाबत.**

संदर्भ : 1) मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी विधिमंडळ अधिवेशानत दिनांक 24/08/2022 रोजी केलेले निवेदन.
2) जा.क्र. मरातंशिमंडळ/का-40/वि.स./उ.प्.22/2022/178 दिनांक 25/08/2022.

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. 1 नुसार माननीय मंत्री महोदय उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी विधान मंडळ अधिवेशनात दिनांक 24/08/2022 रोजी केलेल्या निवेदनाच्या व संदर्भ क्र. 2 नुसार महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण, मंडळ मुंबई यांच्या परिपत्रकाच्या अनुषंगाने उन्हाळी परीक्षा 2022 (212) मधील परीक्षेमध्ये अंतिम सत्र / वर्षातील अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांच्या अनुत्तीर्ण विषयांची तसेच त्यांच्या असलेल्या उन्हाळी परीक्षा 2022 (212) मधील अनुतिर्ण बॅकलॉग विषयांची फेरपरीक्षा अपवादात्मक परिस्थितीत विशेष बाब म्हणून आयोजित करण्यात येत आहेत.

त्याबाबत सर्व संबंधितांना खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

**फेरपरीक्षाबाबतचे संक्षिप्त वेळापत्रक**

| **अ.क्र.** | **फेर-परीक्षेचा तपशील** | **कालावधी** |
|---|---|---|
| 01 | विद्यार्थ्यांनी स्वत:च्या लॉगीनमधून परीक्षा अर्ज आवश्यक ते शुल्क भरून निश्चित करणे. (**Rs. 600/-**) | 06 ते 09 सप्टेंबर 2022 |
| 02 | प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षा (Practical / Oral Exam) | 14 ते 18 सप्टेंबर 2022 |
| 03 | लेखी परीक्षा | 20 सप्टेंबर पासून |

**फेरपरीक्षेबाबत महत्वाच्या सूचना :**

a. ज्या विद्यार्थ्यांनी उन्हाळी परीक्षा 2022 करीता अंतिम सत्र / वर्षातील तसेच त्यांचे असलेले बॅकलॉग विषयांचा परीक्षा अर्ज निश्चित केला होता तसेच उन्हाळी परीक्षा 2022 चा निकाल **Fail/ATKT** असा असेल अशाच विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुत्तीर्ण विषयांकरीताच फेरपरीक्षेची संधी देण्यात येणार आहे.

**b.** फेरपरीक्षेच्या संधीचा लाभ घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज वेळापत्रकानुसार व आवश्यक परीक्षा शुल्कासह स्वत:च्या लॉगीनमधून भरावा. परीक्षा अर्ज निश्चित केलेले विद्यार्थीच फेर-परीक्षा देण्याकरीता पात्र राहतील.

**c.** नियमित उन्हाळी परीक्षा 2022 चा अंतिम सत्र / वर्षातील **Reassessment** चा निकाल दि. 05 सप्टेंबर 2022 पर्यंत जाहीर करण्यात येणार आहे. सदर निकाल जाहीर झाल्यानंतर फेरपरीक्षेकरीता परीक्षा अर्ज भरलेले विद्यार्थी ज्या विषयात उत्तीर्ण होतील अशा विषयांची फेरपरीक्षा घेण्यात येणार नाही. उत्तीर्ण झालेले विद्यार्थी फेरपरीक्षेसाठी पात्र असणार नाही.

d. दिव्यांग विद्यार्थ्यांकरीता संस्थेच्या परीक्षाविषयक नियमावलीतील **ER**-7 (**H**) नुसार देण्यात येतील.

e. उन्हाळी परीक्षा 2022 दरम्यान गैरप्रकार प्रकरणी शिक्षा झालेले अंतिम सत्र / वर्षातील विद्यार्थी सदर फेरपरीक्षेकरीता पात्र असणार नाहीत.

f. सर्व विभागप्रमुखांना सूचित करण्यात येते की, परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार होणार नाही, याची दक्षता घ्यावी. परीक्षेदरम्यान गैरवर्तन झाल्यास मंडळाच्या परीक्षा विषयक नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबत आपल्या विभागातील विद्यार्थी, अध्यापक व इतर कर्मचारी यांना अवगत करावे.

g. शैक्षणिक वर्ष 2022-23 चे प्रथम सत्र 10 ऑगष्ट, 2022 पासून सुरू झालेले असून, हिवाळी 2022 ही परीक्षा सुध्दा माहे डिसेंबर 2022 मध्ये घेण्याबाबत संस्थेच्या शैक्षणिक वेळापत्रकान्वये घोषित करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर शैक्षणिक कामकाज सुरळीत सुरू ठेवणे सुध्दा गरजेचे असल्याने सदर फेरपरीक्षेच्या निकालानंतर गुणपडताळणी, फोटोकॉपी व पुनर्गुणमूल्यांकनाची सुविधा देण्यात येणार नाही.

अंतिम सत्र/ वर्षाकरीता अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुत्तीर्ण विषयांचे आकलन सुयोग्यप्रकारे होण्याच्या दृष्टीने अशा सर्व विद्यार्थ्यांकरीता विषयनिहाय अतिरीक्त अध्यापक वर्ग विभागीय स्तरावर आयोजित करावे. सदर वर्गास विद्यार्थ्यांची उपस्थिती राहण्याकरीता संबंधित अध्यापकांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे.

प्र. प्राचार्या,
शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद.

प्रत : 1) सर्व विभागप्रमुख 2) विद्यार्थी नोटीस बोर्ड 3) विद्यार्थी विभाग.
4) प्रा. जे.पी. जोशी यांना संस्थेच्या वेबपोर्टलवर प्रसिध्दीसाठी.